# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.08.2025** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदासाठीचे उमेदवार
2. निवडणूक आयोग संवैधानिक कर्तव्याशी प्रतारणा करणार नसल्याची मुख्य निवडणूक आयुक्तांची स्पष्टोक्ती
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीत 11 हजार कोटी रुपयांच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन
4. युक्रेन-रशिया युद्धाच्या पार्श्वभुमीवर, युरोपिय नेत्यांसह युक्रेनचे अध्यक्ष ट्रम्प यांना भेटणार आणि
5. मलेशिया इंटरनॅशनल चॅलेंज बॅडमिंटन स्पर्धेत देविका सिहागचा महिला एकेरीत विजय

**<u>उपराष्ट्रपती-उमेदवार</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे नाव घोषित करण्यात आलं आहे. भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. आघाडीतील सर्व सहकारी पक्षांनी या निर्णयाला पाठिंबा दिल्याचं सांगून, उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक सर्वपक्षीय सहमतीनं व्हावी यासाठी सर्व पक्षांशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. गेल्या आठवडाभरात आघाडीतील पक्ष आणि विरोधी पक्षांशी या संदर्भात चर्चा सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. संसदीय मंडळ सदस्यांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासह संरक्षण मंत्री राजनाथ सिंह देखील यासंदर्भातल्या बैठकीला उपस्थित होते. पुढील महिन्याच्या 9 तारखेला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे. दरम्यान, पंतप्रधानांनी समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात राधाकृष्णन हे अनुभव समृद्ध असून, विविध पदांवर काम करताना त्यांनी समाजाची सेवा आणि उपेक्षितांना सक्षम बनवण्यावर भर दिल्याचं म्हटलं आहे. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>निवडणूक-आयोग</u>**

निवडणूक आयोग कोणत्याही पक्षाच्या बाबतीत दुजाभाव करत नसून, आयोग संवैधानिक कर्तव्याशी प्रतारणा करणार नाही, अशी स्पष्टोक्ती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी काल दिल्लीत केली. मतदार यांद्यांविषयी विविध राजकीय पक्षनेत्यांकडून होत असलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर काल मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी काल वार्ताहर परिषद घेतली. दुहेरी मतदानाच्या आरोपाविषयी बोलताना, त्या संदर्भात पुरावे मागितले तर उत्तर मिळत नाही, तरीही निवडणूक आयोग अशा खोट्या आरोपांना घाबरत नसल्याचे ते म्हणाले. सर्व वर्गाच्या, धर्माच्या मतदारांसमवेत भेदभावाविना आयोग निर्भयपणे उभा राहील असेही त्यांनी स्पष्ट केले. लोकसभा निवडणुकीदरम्यान, एक कोटींहून अधिक निवडणूक कर्मचारी, कितीतरी लाख बूथ लेव्हल एजंट, उमेदवारांचे एजंट या प्रक्रियेचे भाग

असताना, मतांची चोरी कशी होऊ शकते असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. सर्वच राजकीय पक्षांकडून मतदार यादीतील चुका दुरूस्त करण्याची मागणी होत असताना त्याची सुरुवात बिहारपासून केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>पंतप्रधान-दिल्ली</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा व्होकल फॉर लोकलचा नारा देत स्वदेशी उत्पादनांच्या वापराचा आग्रह धरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल दिल्लीत 11 हजार कोटी रुपयांच्या दोन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन झालं त्यावेळी ते बोलत होते. भारताला स्वावलंबी आणि अधिक बळकट बनवण्यासाठी चक्रधानी मोहन यांच्या मार्गाचे अनुसरण तर चरखाधारी मोहन यांच्याकडून प्रेरणा घेतली पाहिजे असं ते म्हणाले. जीएसटीच्या टप्प्यातील सुधारणांमुळे देशभरातली नागरिकांना दुहेरी फायदे होतील असंही ते यावेळी म्हणाले. द्वारका एक्सप्रेस वे आणि अर्बन एक्स्टेशन रोड दोन च्या दिल्ली विभागाच्या उद्घाटनामुळे एनसीआर भागातील संपर्कजाळे अधिक विस्तारेल त्यामुळे इथल्या रहिवाशांचा प्रवासादरम्यानचा वेळ वाचणार आहे. दिल्लीतील नागरिकांचे जीवन सुलभ करण्यासाठी सरकार कार्यरत राहील असेही त्यांनी स्पष्ट केले.

**<u>आयुर्वेद चर्चासत्र</u>**

दिल्लीत आजपासून राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठ आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राला प्रारंभ होणार आहे. आयुष मंत्रालयाअंतर्गत असणारी ही स्वायत्त संस्था आहे. आयुर्वेदाद्वारे बालआरोगशास्त्रात आजार आणि कल्याण व्यवस्थापन असा या वर्षीचा विषय आहे. दोन दिवसांच्या या चर्चासत्रामध्ये अनेक विद्वान, संशोधक, अभ्यासक आणि विद्यार्थी सहभागी होणार आहेत. पारंपरीक आयुर्वेदीय दृष्टीकोन आणि बालआरोग्य, बालकल्याण यांना प्रोत्साहन देण्यासाठी समकालीन सिद्ध झालेल्या पद्धतींवर आधारित चर्चा होईल. तसेच, वैज्ञानिक संशोधन सादरीकरणही होणार आहे.

**<u>चीन अर्थमंत्री</u>**

चीनचे अर्थमंत्री आणि चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्युरोचे सदस्य वांग यी आजपासून दोन दिवसांच्या भारतभेटीवर येणार आहेत. देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या आमंत्रणावरून ते भारताला भेट देणार आहे. या भेटीदरम्यान, वांग डोवाल यांच्यासमवेत. भारत-चीन सीमाप्रश्नाच्या विशेष प्रतिनिधींच्या 24 व्या फेरीतल्या चर्चेत सहभागी होती. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर देखील त्यांच्याशी द्वीपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<u>ट्रम्प-झेलेन्स्की भेट</u>**

युक्रेन-रशिया युद्धाच्या निराकरणासाठी येणाऱ्या दबावाच्या पार्श्वभुमीवर, आज वॉशिंग्टनमध्ये सर्वोच्च युरोपीय नेत्यांच्या शिष्टमंडळासह युक्रेनचे अध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यादरम्यान महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या ब्रिटनचे पंतप्रधान सर केयर स्टारमर, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, जर्मन चान्सलर फ्रेडरीक मर्झ, युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयर आणि नाटो संघटनेचे सरचिटणीस मार्क रूट यांचा समावेश आहे. झेलेन्स्की यांच्या भुमिकेला बळकटी देणे आणि कोणत्याही प्रस्तावित शांतता अटींमुळे युक्रेनच्या सार्वभौमत्वाला किंवा दीर्घकालीन सुरक्षेला धोका पोचणार नाही यांची खात्री करण्याची

अपेक्षा या नेत्यांकडून केली जाते आहे. दरम्यान, समाज माध्यमांवरील संदेशात, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आगामी वाटाघाटी आणि आशयाची अटकळ निर्माण करणारी रशियाविषयी प्रगती असे म्हटले आहे.

**<u>गाझा स्थलांतर</u>**

गाझा शहरातल्या रहिवाशांना स्थलांतरीत करण्याच्या योजनेला पॅलेस्टिनी दहशतवादी गट हमासने विरोध दर्शवला आहे. हे पाऊल उचलल्यास, या परिसरातल्या लाखो रहिवाशांसाठी नरसंहार आणि विस्थापित होण्याची नवी लाट निर्माण होईल असल्याचे सांगत हा विरोध दर्शवला आहे. दक्षिण गाझामध्ये तंबू आणि निवारा उपकरणे तैनात करण्याची योजना ही उघड फसवणूक असून सामान्य नागरिकांविरोधातल्या मोठ्या कटाची तयारी असल्याचंही हमासनं म्हटलं आहे.

**<u>इस्रायल</u>**

गाझामध्ये बंदी बनवून ठेवलेल्या कुटुंबियांना पाठिंबा देण्यासाठी इस्रायलमध्ये पुकारण्यात आलेल्या संपामध्ये हजारो नागरिकांनी सहभाग घेतला. पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांनी हमास बरोबर करार करून युद्ध संपवावे आणि इतर बंदींना सोडावे यासाठी हा संप पुकारण्यात आला होता. निदर्शकांनी देशभर आवाजी मोर्चे काढले. तर जेरूसलेम, तेल अवीव इथे जाणाऱ्या रस्त्यांसह, महामार्गही अडवून धरले होते.

**<u>नीरज चोप्रा</u>**

भारतीय ऑलिम्पिक विजेत्या नीरज चोप्राने, स्वित्झर्लंड इथं होणाऱ्या 2025 डायमंड लीगमध्ये अधिकृतपणे आपलं स्थान निश्चित केलं आहे. या हंगामातल्या कामगिरीमुळे चोप्रा स्पर्धेला पात्र ठरला आहे.

**<u>बँडमिंटन</u>**

भारताची बॅडमिंटनपटू देविका सिहागने मलेशिया इंटरनॅशनल चॅलेंज बँडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीत विजेतेपदाला गवसणी घातली. तिने पाचव्या मानांकित इशाराणी बरुआ हिचा पराभव केला. ही स्पर्धा जागतिक बँडमिंटन फेडरेशनच्या प्रायोगिक 3×15 स्कोअरिंग फॉरमॅट अंतर्गत खेळवली जात आहे.

**<u>ढगफुटी</u>**

जम्मू आणि काश्मीरमधील कथुआ जिल्ह्यात काल पहाटे झालेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ढगफुटी आणि त्यामुळे आलेल्या पुरामध्ये किमान सात व्यक्ती जण ठार झाल्या असून इतर पाच जण जखमी झाले आहेत. राजबागच्या जोध घाटी गावात आणि जंगलोट इथं या घटना घडल्या. दरम्यान, जोध घाटीमधून पाच व्यक्तींना रुग्णालयात हलवण्यात आलं आहे, आपत्तिग्रस्त भागात पोलिस, राज्य आपत्ति व्यवस्थापन दल आणि स्थानिक स्वयंसेवक एकत्रितपणे बचावकार्य करीत आहेत.

**<u>जम्मू-मुख्यमंत्री</u>**

जम्मू आणि काश्मीरच्या कथुआ जिल्ह्यातील काही भागात ढगफुटीमुळे झालेल्या जीवित आणि वित्त हानीबद्दल जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. आपत्तिग्रस्त नागरिकांना

मुख्यमंत्री मदतनिधीमधून मदतीची घोषणाही त्यांनी केली आहे. त्यानुसार मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 2 लाख रुपये, गंभीर जखमी व्यक्तीस 1 लाख रुपये आणि किरकोळ जखमी व्यक्तीस 50 हजार रुपये दिले जाणार आहेत. घरांच्या नुकसानीसाठीही 1 लाख ते 25 हजार रुपये नुकसानीच्या तीव्रतेनुसार अर्थसाह्य दिलं जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कथुआतील परिस्थितीबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली असून केंद्राकडून सर्व आवश्यक सहाय्य देण्याचं आश्वासन दिलं आहे.

**<u>पाऊस</u>**

भारतीय हवामान खात्याने गोवा, महाराष्ट्र, गुजरातमध्ये पुढील सात दिवसांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच छत्तीसगड, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगण, कर्नाटक, कोकण आणि मध्य महाराष्ट्रासाठी पावसाचा लाल बावटा दिला आहे. तसंच, गुजरात, विदर्भ, मध्य प्रदेश, मराठवाडा, केरळामध्ये काही भागात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रात पुणे जिल्ह्याच्या घाट परिसरात पुढील चोवीस तासांसाठी पावसासाठीचा लाल बावटा हवामान विभागाने जारी केला आहे. दरम्यान, मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.